दिनांक 21 व 22 मार्च, 2014 रोजी अहमदाबाद येथील मा. सचिवांचा दौरा अहवाल.

प्रधान सचिव (कामगार), गुजरात शासन व कामगार विभाग, महिला व बाल विकास विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या अधिका-यांसोबत दिनांक 21/3/2014 रोजी बाल कामगारांच्या समस्या, बाल कामगारांची सुटका, त्यांचे पुनर्वसन व पुनर्वसनानंतर त्यांची देखभाल तसेच अवैध बाल वाहतूक, काळजी व संरक्षण याखाली येणारी बालके, तसेच विधिग्रस्त बालक, हरवलेल्या बालकांना शोधण्याची कार्यप्रणाली या सर्व विषयांवर चर्चा झाली. व या सर्व बाबींची जाणीव गुजरात राज्याबाबत अधिका-यांनी करून दिली.

2. बाल कामगारांची सुटका या प्रकरणावर प्रधान सचिव, कामगार यांनी अशी माहिती दिली की, ज्या मालकांच्या कब्जातून बाल कामगारांची सुटका केली जाते त्या मालकाविरूध्द तसेच त्या बालकांना ज्या लोकांनी तेथे पाठविले असेल अशा त्रयस्थ व्यक्तीविरूध्द फौजदारी कायदा कलम 34, 317 व फौजदारी कायदा सुधारणा 2013 कलम 370(1) व इतर कलमांचा वापर केला जातो. या सर्व कलमाखाली मालकाच्या विरूध्द गुन्हा दाखल होतो तसेच मालकाला पोलीस अटक करतात. तेव्हा लोकांमध्ये भिती निर्माण होते व बाल कामगारांच्या वापरावर काही प्रमाणात प्रतिबंध येऊन बाल कामगारांच्या समस्या सुटतात. अशा बाबतीत त्यांचेकडून यशस्वी झालेल्या प्रकरणांची माहिती देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

3. काळजी व संरक्षण या खालील येणारे मुलांचे बद्दल परिस्थिती गुजरात राज्यात चांगली आहे. संपूर्ण राज्यात बालगृहात फक्त 4000 मुले तेथे राहतात. याचा अर्थ असा आहे की, ज्या मुलांचे पालक नसतात किंवा एक पालक असतात व पालकामध्ये काही समस्या असतात, अशा मुलांचे इतर कारणांमुळे त्यांची काळजी व संरक्षण त्यांच्या कुटुंबातील इतर लोक जसे काका, आजोबा, आजी व समाजातील लोक पुढाकार घेऊन करतात तसेच त्यांचे संरक्षण करतात म्हणून अशा मुलांना बालगृहात पाठविण्याची गरज नसते.

4. सूरत व इतर शहर सोडून राज्यात देहविक्रय या धंद्यात गुंतलेल्या महिलांची संख्या फार कमी आहे.

5. दत्तक मुलाबद्दल अधिका-यांचे मत होते की गुजराती लोक जे बाहेरच्या देशातील आहेत. ते येथे येऊन दत्तक घेतात. केन्द्रशासनाचे जे दत्तक धोरण देशीय व

Approved

परदेशी दत्तकाबद्दल 80 व 20 असे निश्चित केलेल्या ह्या अटीत बदल केला पाहिजे.

6. हरवलेल्या बालकांबद्दल तसेच बाहेरून येणा–या बालकांचा ट्रैक रेकॉर्ड ठेवण्याबद्दल रेल्वेस्टेशन, बस डेपो इत्यादि ठिकाणी पथक कार्यरत आहे. भटक्या व विमुक्त जाती जमातीच्या मुला/मुलींचे व असे बालक ज्यांचे कुटुंबाच्या कामाकरिता स्थलांतर होते, अशा मुला/मुलींच्या शिक्षणाकरिता समाजकल्याण विभागाकडे वस्तीगृहे आहेत व त्यामध्ये सुमारे 1 लाख मुले/मुली शिक्षण घेतात. गुजरात राज्यामध्ये कुटुंबाची व्यवस्था चांगली असल्यामुळे बालकांच्या संरक्षण व काळजी करण्याच्या समस्या कमी आहेत. बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळा या सर्व संस्थांच्या लोकांचे प्रशिक्षणाचे कार्यक्रम सुरू आहेत.

7. <u>सफाई व पर्यावरण केन्द्र तसेच गांधी आश्रम सफाई विद्यालयाची पाहणी :–</u>

गांधी आश्रम सफाई विद्यालय तसेच सफाई व पर्यावरण केन्द्र याची स्थापना महात्मा गांधी यांचे विश्वस्त सहकारी ईश्वरभाई पटेल यांनी केली. बालकांमध्ये स्वच्छतेचे व सफाईची प्रवृत्ती कशी विकसित करावयाची याचे प्रात्यक्षिक काम करून व हे केले जाते, हा या विद्यालय व केन्द्राचा मूळ उद्देश आहे. सफाईद्वारे मिळालेला जो घनकचरा असतो त्याचा वापर खत करण्यासाठी केला जातो. सांडपाणी शुध्द करून त्याचा वापर सिंचनासाठी केला जातो. अंगणवाडी सेविका व अंगणवाडी येथे पोषण, आरोग्य, स्वच्छता, सफाई, शिक्षा, कुटीर उद्योग या सर्व विषयावर सरकारी कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी, पंचायत राज्य संस्थेचे प्रतिनिधी या सर्वांकरिता विशेष प्रशिक्षण दिले जाते. गरोदर माता व स्तनपान करणा–या मातांनासुध्दा प्रशिक्षण दिले जाते.

8. <u>गुजरात विद्यापीठाची पहाणी.</u>

गुजरात विद्यापीठ हे महात्मा गांधी यांनी स्थापन केलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठात हात, डोके, हृदय याचा वापर करून शिक्षणाची व्यवस्था केली जाते. सर्व बालकांना सूतकताई, शिल्प व हाताद्वारे केले जाणारे काम शिकवून त्या आधारावर शिक्षणाची व्यवस्था केल्यामुळे बालकांमध्ये काम करण्याची प्रवृत्ती विकसित होऊन त्यांच्या सृजनात्मक शक्तीचा विकास होतो.